आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२१ जानेवारी २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- प्रजासत्ताक दिन संचलनाची जोरदार तयारी सुरु
- आदिवासी बहुल प्रदेशातल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रधानमंत्री जनमन परिषदेचं दिल्लीत आयोजन
- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या संकल्पपत्राचा दुसरा भाग जाहीर
- अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्र स्वीकारताच डोनाल्ड ट्रंप यांचा निर्णयांचा धडाका

**आणि**

- छत्तीसगड आणि ओदिशात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत १४ नक्षली अतिरेकी ठार

**<><><><><><>**

येत्या रविवारी २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या शानदार संचलनाच्या कार्यक्रमात भारताचं सांस्कृतिक वैभव आणि भारतीय सैन्य दलाचं कौशल्य याचं दर्शन घडणार आहे. त्यात सहभागी होणाऱ्या पथकांचा कसून सराव चालू आहे. हवाई दलाच्या हेलिकॉप्टर्सनी आज हवाई कसरतीचा सराव केला.

भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त विशेष दोन चित्ररथ यंदाच्या संचलनात सहभागी होणार आहेत. इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुब्रियांतो हे या संचलनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावर्षीच्या संचलनात इंडोनेशियाच्या १६० सैनिकांची एक तुकडी आणि १९० जणांचं लष्करी बँड पथक सहभागी होणार आहे. तसंच भारतीय राज्यघटनेला ७५ वर्ष पूर्ण झाल्या

निमित्तानं देशाच्या विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे ३१ चित्ररथ सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमासाठी देशभरातून ३४ विविध क्षेत्रातल्या दहा हजार मान्यवरांना आमंत्रित करण्यात आलं आहे.

<><><><><>

मेघालय, त्रिपुरा आणि मणिपूर या राज्यांचा स्थापनादिवस आज साजरा होत आहे. राषट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या तिन्ही राज्यांना स्थापनादिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या राज्यांमधल्या कष्टाळू आणि उद्योगी नागरिकांनी देशाच्या विकासात हातभार लावला असल्याचं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. भारताची ही तीन झगमगती रत्नं समृद्ध वारशाची आणि विविधतेत एकता या वैशिष्ट्याची प्रतिकं असल्याचं उपराषट्रपतींनी म्हटलं आहे. मणिपूरच्या जनतेने राष्ट्रविकासात दिलेल्या योगदानाचा साऱ्या देशाला अभिमान असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. मेघालय आणि त्रिपुराच्या योगदानाचाही प्रधानमंत्र्यांनी गौरव केला आहे.

<><><><><>

केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयाच्या वतीने नवी दिल्लीत भारत मंडपम इथं प्रधानमंत्री जनमन परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम आणि राज्यमंत्री दुर्गादास उईके हे या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री जनमन अभियानाचा उद्देश शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणं हा असून, एकंदर सहा क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. या परिषदेत देशातल्या १८ राज्यातले ८८ आदिवासी बहुल जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी चर्चेत भाग घेणार असून, अजूनही विकासापासून वंचित राहिलेल्या मागास जिल्ह्यांच्या विकासासाठी एक कृती आराखडा तयार केला जाणार आहे.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या संकल्प पत्राचा दुसरा टप्पा भाजपा नेते अनुराग ठाकूर यांनी नवी दिल्लीत प्रसार माध्यमांसमोर आज जाहीर केला. या संकल्पपत्रात दिल्लीतल्या तरुणांना स्पर्धा परीक्षांसाठी १५ हजार

रुपयांची मदत, तसंच दोन वेळचा प्रवास आणि अर्ज शुल्काची परतफेड करण्याचं आश्वासन दिलं आहे. भाजपाचं सरकार आल्यास गरजू विद्यार्थाचं केजीपासून ते पदव्युत्तर पदवीपर्यंतचं शिक्षण सरकारी शैक्षणिक संस्थांमार्फत मोफत दिलं जाईल, अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रम शिकण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यावेतन योजनेअंतर्गत दरमहा एक हजार रुपये दिले जातील, असं आश्वासन ठाकूर यांनी दिलं. त्याशिवाय १० लाखांचा आयुर्विमा, अपघात विमा आणि रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी ५ लाख रुपयांचा वाहन विमा तसंच त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती दिली जाईल, असंही या संकल्प पत्रात नमूद आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनातलं अमृत उद्यान येत्या २ फेब्रुवारीपासून सर्वांसाठी खुलं होणार आहे. येत्या ३० मार्चपर्यंत आठवड्याचे ६ दिवस सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात कोणालाही या उद्यानाची शोभा पाहता येईल. राषट्रपती भवनाच्या संकेतस्थळावर त्याच्या विनामूल्य प्रवेशिका उपलब्ध आहेत.

देशाच्या समृद्ध परंपरेचं दर्शन घडवणारा विविधता का अमृत महोत्सव येत्या ६ मार्चपासून अमृत उद्यानात साजरा करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाचा पदभार स्वीकारताच डोनाल्ड ट्रम्प यांनी काही तासातच अनेक कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी केली. स्थलांतरितांच्या प्रवेशाला आळा घालणं, जीवाश्म इंधनाचं उत्पादन वाढवणं आणि २०२१ पॅरिस हवामान करारासह पर्यावरणीय नियम मागे घेणं हे निर्णय ट्रम्प यांनी पहिल्याच दिवशी घेतले. जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णयही त्यांनी घेतला आहे. कोविड महामारीची साथ नीट न हाताळणं आणि त्यावर तातडीच्या उपाययोजना न करणं या कारणांमुळे हा निर्णय घेतल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं. जागतिक आरोग्य संघटनेनं अमेरिकेकडून जास्त पैसे उकळले, मात्र चीनकडून कमी पैसे घेतले अशी तक्रार

त्यांनी केली. या निर्णयानंतर पुढच्या बारा महिन्यात अमेरिका जागतिक आरोग्य संघटनेतून बाहेर पडेल आणि त्यांची आर्थिक रसद थांबवेल.

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वर्क फ्रॉम होमची सोय बंद करण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनानं घेतला आहे. तसंच ट्रम्प यांनी राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी घोषित केली असून खाणकामावरील निर्बंध उठवले आहेत. जीवाश्म इंधनाच्या उत्पादनाला प्रोत्साहन द्यायचं त्यांनी ठरवलं आहे.

नागरिकांचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार पुनर्स्थापित करण्यात येईल तसंच केंद्र सरकारचं नियंत्रण कमी केलं जाईल, असं ट्रम्प यांनी सांगितलं. मेक्सिकोच्या आखाताचं नाव बदलून 'अमेरिकेचं आखात' असं ठेवण्यात आलं आहे. त्याचप्रमाणे यापुढे अमेरिकेत पुरुष आणि महिला असे दोनच लिंगभाव असतील, असा निर्णय ट्रम्प यांनी घेतला. ६ जानेवारी २०२१ रोजी राजधानीत झालेल्या दंगलीत सहभागी असलेल्या १५०० जणांना माफ करायचा निर्णयही ट्रम्प यांनी घेतला आहे.

<><><><><><>

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज बेल्जियमचे परराष्ट्र मंत्री बर्नार्ड क्विंटीन यांच्याशी ब्रसेल्स इथं द्विपक्षीय चर्चा केली. बेल्जियमचं परकीय व्यापारावरचं अवलंबित्व आणि भारताची गतिमान, वाढती अर्थव्यवस्था यांमुळे संबंध अधिक दृढ होतील, यावर दोन्ही पक्षांची सहमती झाली. तसंच, युरोपीयन महासंघ आणि भारताच्या मुक्त व्यापार करार वाटाघाटींच्या प्रगतीवरही द्विपक्षीय चर्चा झाली.

<><><><><><>

छत्तीसगडमधल्या गरियाबंद जिल्ह्यात आणि ओदिशामधल्या नुआपाडा जिल्ह्यात काल सुरक्षा दलाच्या कारवाईत १४ नक्षलवादी मारले गेले. काल दोन महिला नक्षलवाद्यांचे तर आज १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले. सुरक्षा दलाने घटनास्थळावरून एका रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केला आहे. पोलीस आज या परिसरात व्यापक शोधमोहीम राबवत आहेत.

या कारवाईमुळे नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसला असून नक्षलमुक्त भारत अभियानाच्या दृष्टीने सुरक्षा दलाचं हे मोठं यश आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नक्षलवाद आपल्या शेवटच्या घटका मोजत आहे, असं शहा म्हणाले.

<><><><><><>

दावोस इथं जागतिक आर्थिक मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या दालनाचं उद्घाटन केलं. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह विविध राज्यांचे आणि केंद्रीय मंत्री उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस आज विविध कंपन्यांच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत, तसंच अनेक सामंजस्य करार करणार आहेत. जागतिक आर्थिक मंचाच्या स्वागत समारंभाला ते आज उपस्थित राहणार आहेत. त्याआधी मुख्यमंत्र्यांनी जागतिक आर्थिक मंचाचे संस्थापक क्लॉस श्वाब आणि होरॅसिसचे अध्यक्ष फ्रँक जर्गन रिक्टर यांची भेट घेतली. मुंबईत होरॅसिसचं मुख्यालय आणण्याबाबत यावेळी मुख्यमंत्र्यांनी रिक्टर यांच्याशी चर्चा केली.

<><><><><><>

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत स्पेनच्या पॉला बाडोसा हिनं जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या अमेरिकेच्या कोको गॉफला हरवून उपांत्य फेरीत धडक मारली. तिनं कोको गॉफचा ७-५, ६-४ असा सहज पराभव केला. उपांत्य फेरीच्या आजच्या दुसरा सामन्यात अग्रमानांकित अरीना साबालेंका हिच्यासमोर अनास्ताशिया पावलुचेंकोवा हिचं आव्हान असेल.

दुसरीकडे पुरुष एकेरीत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्ह यानं अमेरिकेच्या टॉमी पॉलला ७-६, ७-६, २-६, ६-१ नमवत उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात आज दुपारी स्पेनचा कार्लोस अल्काराज आणि सर्बियाचा नोव्हाक ज्योकोविच यांच्यात उपांत्य फेरीत जागा मिळवण्यासाठी अटीतटीची लढत रंगेल.

<><><><><><>

मलेशिया इथ सुरू असलेल्या २० षटकांच्या १९ वर्षाखालील महिला विश्वचषक क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत आज अ  गटात भारतीय संघाचा सामना यजमान मलेशिया संघाशी होणार आहे. भारतीय वेळेनुसार क्वाललांपूर  इथ आज दुपारी हा सामना खेळला जाणार आहे. दुसरा सामना श्रीलंका आणि वेस्ट इंडिज यांच्यात होईल. दरम्यान, रविवारी झालेल्या सामन्यात भारतीय महिला संघानं वेस्ट इंडिजचा अवघ्या ४ षटकात  केवळ ४४ धावांच्या बदल्यात ९ गडी राखून पराभव केला.

//<><><><><><>//